
धम्माल गोवा
जितेश उबाळे

# धम्माल गोवा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# धम्माल गोवा

जितेश देविदास उबाळे

ई साहित्य प्रतिष्ठान

**धम्माल गोवा (पर्यटन)**

जितेश देविदास उबाळे

९९२१४८३९९३

मु. पो. किन्हवली ता शहापूर, जि. ठाणे

ईमेल- jituubale25@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २० जून २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## अर्पण पत्रिका

ज्याला ज्याला भटकंतीची आवड आहे,

नवीन ठिकाणी फिरायला जायची हौस आहे

अश्या धेयवेड्या वीरांना हे माझं पहिलं पुस्तक अर्पित करतो.

# मनोगत



तसं बघायला गेलं तर वाचनाची आवड लहानपणापासूनच. कारण वाचनाची आवड हि अ आ इ इथूनच आणि त्यात जिल्हा परिषद शाळा, त्यामुळे मराठीचा लळा लागणे स्वाभाविक.

जिल्हा परिषद नंतर माध्यमिक शाळेत मग वाचनाची वेगळीच आवड निर्माण झाली. त्यात मराठी विषयाला लाभलेले सर्व गुरुवर्य यांचं योग्य मार्गदर्शन या मुले आणखीन रुची निर्माण झाली. इतिहास आणि भूगोल हा माझा आवडत विषय त्यामुळे गड किल्ले,दुर्गम भाग,दऱ्या खोऱ्या,नद्या,पाऊलवाट,डोंगर, अश्या अनेक भागांबद्दल मनोमनी उत्सुकता वाटू लागली. आणि पुढे मग ते मनात साठवत गेलो.

वाचन करताना नामदेव ढसाळ यांचा माझ्यावर खास करून प्रभाव पडला. त्यांचं बरंच साहित्य हे विद्रोही आहे आणि मी वाचलं आहे. अण्णा भाऊ साठे, बाबासाहेब आंबेडकर, गोविंद पानसरे, यांचं देखील साहित्य वाचलं आहे.

कॉलेजला असतांना जरी इंग्लिशमध्ये पुस्तके होती तरीसुद्धा मी मराठी पुस्तके आवर्जून वाचत होतो. आणि त्यामुळेच मला वाचायची लिहायची आवड निर्माण झाली.

ज्या वयात समज आली तिथून गड किल्ले नवीन प्रवास नवीन ठिकाण बघायला सुरु केलं. आणि म्हणूनच लिहायची रुची निर्माण झाली आणि लिहायला लागलो.

माझा मित्र ओंकार अशोक झाँजे याचे मी आभार मानतो तसेच माझा मित्र परिवार अमृता मनवी, दिप्ती भोईटे, अनुकूल थळकर, मींनाथ मोकल, अमोल, नितेश पाटील यांनी सुद्धा मला हे पुस्तक लिहायला प्रेरणा दिली

त्याच बरोबर माझ्या घरातील मंडळी माझे आई, बाबा, काका, काकी यांमुळे मला हे पुस्तक लिहायला ऊर्जा मिळाली. माझं हे पहिलं पुस्तक आहे, जे आम्ही अनुभवलं ते मी या मध्ये लिहलं आहे, नक्कीच तुम्हाला माझं प्रवास वर्णन आवडेल अशी अपेक्षा करतो.

आवडल्यास नक्की तुमचा अभिप्राय कळवा.

शेवटी एकच सांगतो One Life One Way One passion One story That is TRAVEL❤️💙

जितेश देविदास उबाळे

मु पो किन्हवली ता शहापूर ठाणे

९९२१४८३९९३

# धम्माल गोवा ट्रिप

# एक अविस्मरणीय आठवण...

तस बघायला गेलं तर गोव्याला मित्र मैत्रिणीसोबत जाऊन धम्माल मस्ती करण हे तर आमच्या सारख्या लहरी मुलांची स्वप्न.. . नेहमी वाटायचे कि आपण गोव्याला जाऊ, तिकडे मस्त एन्जॉय करू पण तसं मात्र फक्त स्वप्नात दिसायचं. त्याची पूर्तता हि होत नव्हती..

खर तर आम्ही डिप्लोमाचे मित्र, २०१३ सालापासून झालेली आमची ओळख आजतागायत तशीच. तसं बघायला गेलं तर खूप मोठा ग्रुप आमचा पण नोकरी शिक्षण यामुळे काही जण दुरावले आणि आम्ही सर्व अधिक जवळ येत गेलो. आधी आम्ही कर्नाटक जाऊन आलो होतो तेव्हाच आम्ही ठरवलं कि गोव्याला जाऊया?? त्यावर सर्वांनी होकार दर्शविला..

झालं ठरलं तर मग, 29 मार्च ला आपण निघतोय असा msg अमृता ने केला त्यावर आम्ही सर्वांनी होकार दिला (मी अमृता, ज्योती, दिप्ती, अनुकूल, नितेश आणि minnat) असा आमचा हा ग्रुप होता😊ठरल्या प्रमाणे मी हॉटेल बुक केलं, नितेश ने ट्रेन ची तिकीट काढली आणि २९ तारीख कधी येतेय याची आम्ही वाट बघू लागलो. दिवस पुढे जात होते तशी आमची उत्कंठा अजूनच वाढत चालली होती. बाकी मग सगळे जॉब ला असल्या कारणाने सगळ्यांनी सुट्ट्या टाकून ठेवल्या होत्या. ज्योती चा फिक्स होत पण ऐनवेळी ज्योती ला सुट्ट्या नाही भेटल्या त्यामुळे ज्योती येणार नव्हती. आमचा एक मेंबर कमी झाला याचं वाईट वाटलं.

बघता बघता २९ मार्च ची सकाळ झाली😊 सगळे आम्ही पनवेल ला भेटणार होतो, तशी ट्रेन ४ २० ची होती



*(हा माझा अवलिया ग्रुप जो नेहमी बाहेर भटकंती करायला सदैव तत्पर असतो. सदर फोटो मध्ये उजवीकडून अनुकूल अमृता मींनाथ मी अमोल नितेश आणि दिप्ती आमचा फोटो काढण्यात व्यस्त होती, हा आमचा पहिला फोटो होता.)*

(Mastyagandha superfast express) त्यामुळे मी मुरबाड-ठाणे-पनवेल असा प्रवास करत पनवेल ला ३ वाजता पोहचलो , माझ्या आधी अमृता आणि अनुकूल हे तिथे पोहचले होते आम्ही तिघे तर आलो बाकी नितेश दिप्ती आणि मींनाथ मागे पूढे आले, नितेश त्याच्या एका मित्राला घेऊन आला होता म्हणजे अमोल ला, असे मिळून आम्ही ७ जण झालो होतो आणि तिकीट फक्त ५ कन्फर्म होती. ट्रेन आली तशी आमच्या चेहऱ्यावर आपसूक हसू आलं.

ट्रेन मध्ये आम्ही चढलो आणि आमच्या सीट्स आम्ही घेतल्या, सर्व समान, बॅग्स एका ठिकाणी ठेवल्या आणि जोरात हॉर्न ऐकू आला तशी आमची जर्नी सुरु झाली..

नितेश दिप्ती सोबत माझा हा दुसरा लांब पल्ल्याचा प्रवास होता त्यामुळे मला इतका नवल नाही वाटलं पण रात्रीचा प्रवास होता त्यामुळे मन खूप आनंदी होत.




पनवेल नंतर ट्रेन थांबली ती माणगाव ला. माणगाव आणि आमचा एक नवीनच नात होत कारण आम्ही कॉलेज ला असतांना याच माणगाव रेल्वे स्टेशन ला उतरून पुढे प्रवास करायचो कारण याच तालुक्यात आमचा ENGINEERING COLLEGE होत (डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तांतशास्र विद्यापीठ लोणारे) होतं त्यामुळे माणगाव बद्दल अपार प्रेम होत म्हणून न राहवत तर आम्ही फोटोच काढलं.

साधारणपणे रात्री २ वाजता आमची ट्रेन मडगाव ला पोहचणर होती पुढे जात होती, आम्ही कुणीच सोबत जेवणाचे डब्बे नव्हते घेतले परंतु दिप्ती ने आम्हा सगळ्यांना पुरेल इतका जेवण आणलं होत आणि मग आम्ही तेच जेवलो मग ट्रेन मध्ये धमाल मस्ती करत करत वेळ पुढे जात होती.



जिथे जिथे ट्रेन थांबायची तिथे तिथे आम्ही फोटो काढायचो





रात्री १० वाजता ट्रेन रत्नागिरी ला पोहचली तेव्हा आम्ही आवर्जून फोटो काढला कारण आम्ही आधीच ठरवलं होत कि जेवढे थांबे ट्रेन घेईल तेवढेच आपण सुद्धा फोटो काढायला घेऊ

रात्रीचे २. ५० झाले होते, ट्रेन पुढे मडगाव ला थांबली आम्ही आमचा समान वैगेरे घेऊन उतरलो. आधी आम्ही एका जागी थांबलो तिथे २०मिनिट बसलो. मी माझा टूथ ब्रश घरी विसरलो म्हणून स्टेशन वर एक दुकान चालू होत तिथून मी ते घेतला आणि मग आम्ही ३वाजता स्टेशन च्या बाहेर टॅक्सी जिथे मिळतात तिथे गेलो,




*(आम्ही जेव्हा मडगाव ला उतरलो तेव्हा स्टेशन च्या बाहेर टॅक्सी स्टँड आहे तिथला हा फोटो आहे, यात एक प्रकारे गोवा दर्शन दाखवलं आहे, हा एक प्रकारचा आमच्या साठी गूगल मॅप होता आणि हा फोटो बघून आमच्या मनात खूप उत्सुकता निर्माण झाली होती)*

आधी आम्ही चौकशी केली तेव्हा २१०० रुपये घेऊ असा त्या लोकांनी सांगितलं. तशी २१०० हि रक्कम जास्तच वाटत होती कारण मडगाव ते अरपोरा (गोआ) हे अंतर १ तासाचं होतं साधारण. कसाबसा १७०० साठी ड्राइवर तयार झाला आणि आम्ही टॅक्सी मध्ये बसलो तिथून गोवा साधारण १ तासावर होता आम्ही पहाटे ४ ३० वा आमच्या हॉटेल वर पोहचलो, पण त्याआधी आम्ही जी गोव्याच्या मुख्य ब्रिज वर जी रोषणाई बघितली होती ती सुद्धा तितकीच मनमोहक होती



*हा तोच ब्रिज आहे ज्याची रोषणाई हे कोणालाही मोहून टाकील पहाटे पहाटे हा नजरा बघितला होता सगळा थकवा एका क्षणात विसरलो होतो.*

आमच्या हॉटेल च नाव होतं "हॉटेल मेलो रोसो रिसॉर्ट "नाव थोडं विचित्रच होत..



आम्ही रेसेप्शन ला पोहचलो तो पर्यंत तिथला माणूस झोपला होता आम्ही त्याला उठवलं , आमची बॅलन्स रक्कम आणि ID कार्ड्स जमा करायला वेळ गेला. पहाटेचे ५ ५० होत होते. मी रूम बघून आलो आणि मग आम्ही रूम्स फायनल केल्या.




*((इतकी भयानक झोप आली असताना सुद्धा आमची फोटो काढायची हौस काही जात नव्हती, आमच्या चेहऱ्यावरचं स्मितहास्य आमचा थकवा एका क्षणात नाहीस करत होत. सोबत अमृता आणि मी)*




*(हा फोटो आमच्या हॉटेल च्या आतील मेन इंट्रान्स ला होता , त्यात रूम्स पब रेस्टॉरंट आणि स्वीमिन्ग पूल ची माहिती दाखवली होती हे बघूनच आम्हला अधिकच उत्सुकता वाटू लागली)*

आधी ठरल्याप्रमाणे आम्हाला C विंग मध्ये १०१ आणि १०२ अस १BHK रूम्स भेटले अगदी जशे आम्हाला रूम्स हवे होते तशेच ते भेटले आणि मुख्य म्हणजे २ फ्लॅट्स मध्ये प्रशस्त हॉल बेडरूम बाहेर ३ बाल्कनी असा भव्य आमची सोया झाली. तशी झोप पण खुप जास्त आली होती आम्ही फ्रेश झालो आणि बेडवर झोपी गेलो , हसावं कि रडावं अशी आमची अवस्था झाली होती कारण झोप पण खूप घेऊ शकत नव्हतो गोवा फिरायची हौस अंगात भरली होती , आम्हीइ अंदाजे फक्त २ तास झोपलो आणि ९ वाजता उठलो.



*(हा फोटो मी सकाळी उठल्या उठल्या आमच्या बाल्कनी मधून काढला होता कारण इतकी नयनरम्य पहाट मी पहिल्यांदा अनुभवत होतो आणि आता खरं गोव्यात आल्याचा थ्रिल येत चाललं होत)*

आमच्या हॉटेल च्या मधोमध एक मस्त स्विमिंग पूल आम्हाला आकर्षित करत होता



*(हाच तो स्वीमिन्ग पूल ज्या साठी आम्ही आधी ३ रूम्स कॅन्सल केले होते, कारण आम्हाला रूम सोबत पूल सुद्धा हवा होता आणि आमची पहिली अंघोळ हि इथेच झाली)*



*पोहण्याच्या आधी काढलेले फोटो*

आमची पहिली अंघोळ हि त्या पूल मधेच. आता खरोखर गोव्याला आलोय असा वाटायला लागलं होत, पूल मध्ये मस्ती करून झाली फोटो काढून झाले आणि स्टेटस टाकून पण झाले आता भूक लागली होती , पण एक बर होत कि आम्हला सकाळचा नाश्ता हा हॉटेल कडून होता त्यामुळे आम्हला नाश्ता करण्यासाठी बाहेर जायची गरज नव्हती आम्ही मेनू बघितला तर तिथे त्या दिवशी पोहे होते जरा बर वाटलं कारण पोहे माझे आवडते डिश. आमच्या सोबत नाश्ता करायला Russian लोक होते ते फक्त १ च प्लेट पोहे खात होते तोवर माझ्या दिप्ती आणि नितेश च्या २प्लेट्स पोहे खाऊन झाल्या होत्या.

मी जे हॉटेल बुक केलं होत तिथून बागा बीच, कॅडोलीम बीच, Calangute beach हे अगदी जवळ होते त्यामुळे आम्हाला भटकंती करायला सोप जाणार हे आधीच माहिती होत. आम्हाला सगळंच नवीन होत त्यामुळे जवळचा रस्ता सुद्धा लांब वाटत होता, तसं पण ऊन डोक्यवर येत होत दुपार होत चाली होती आजूबाजूला एका रांगेत धाबे हॉटेल्स होते आम्ही एका ठिकाणी थांबलो




*जेवणाच्या आधी एका ठिकाणी ग्रुप फोटो काढला होता*

आम्ही जेवण ऑर्डर दिल🤗 आमची ऑर्डर येईपर्यंत आम्ही फोटो काढत बसलो होतो इतक्यात आमची मेनू ऑर्डर आली(बिर्याणी)






आणि त्या बिर्यानीवर आम्ही ताव मारला (नितेश अनुकूल यांनी फिश करी)घेतली होती. आता बागा बीच २ मिनिटाच्या अंतरावर होता आता मात्र आमचं ते स्वप्न होत ते पूर्ण होत होतं.

आजवर फक्त टीव्ही फोटो या मध्ये पाहिलेले गोव्याचे किनारे आम्ही डोळ्यांनी बघत होतो त्या पाण्याच्या लहरींना स्पर्श करत होतो😘




*We 7 in one Frame बागा बीच वरील हा फोटो, आमच्या चेहऱ्यावरील हास्य हे खूप काही सांगून जात होत याचा प्रत्यय आम्हाला वेळोवेळो येत होता*



बीच वर फिरता फिरता इतकं ऊन होत तरी आमची फोटो काढायची हौस काही जाईना.. फोटो मध्ये अमृता ची pose आणि smile तुरळक प्रमाणात दिसली.

आम्ही दिवसभर वणवण तिथेच भटकत होतो. आमच्या मध्ये कुणीच दारू पिणार नव्हतं त्यामुळे कसलीच चिंता नव्हती. पण आम्ही brezzers मात्र आवर्जून प्यायलो






*सूर्य तर तसा बघायला गेला तर खूपच दूर परंतु त्याला आपल्या जवळ आणण्याचा मी छोटा प्रयत्न केला आणि अमोल ने त्याच क्षणी हा फोटो काढला..*



एकीकडे अंधार झाला आता मात्र डोळे दीपावले कारण रात्रीचा नजारा इतका मनमोहक होता कि आमचे पाय त्या जागेतून निघायचं नाव घेत नव्हते.

या खुर्च्यांमध्ये बसून हा नजारा न्याहाळत बसणे ती मज्जाच काही और



*(गोव्याची खासियत असलेली दृश्य, हा फोटो बागा बीच वर काढला होता, मनाला गारवा देणारा हा क्षण होता, चौफेर रोषणाई होती आणि आम्ही सगळं टेन्शन विसरून त्या रोषणाई मध्ये अगदी मोहून गेलो होतो)*



चौफेर रोषणाई उत्तुंग उडणारे पक्षी कॅण्डल्स दिवे यांनी आमचं मन काबूत केलं होत. रात्र होत होती तितक्यात calangute बीच च्या बाहेर बिर्याणी सेंटर होत आम्ही प्रत्येकासाठी बिर्याणी ऑर्डर केली पैसे दिले आणि आमच्या रूम वर येऊन पोहचलो.

तिथेच एक सेंड बार नावाचा फोटो काढण्यासाठी जागा होती आम्ही तिथे गेलो आणि आम्ही पण त्या लोकेशन मध्ये फोटो काढू लागलो.




आमचा फोटोसॅशन बघून सगळेच नंतर फोटो काढायला लागले.

*मी आणि नितेश*

खूप दमलो होतो आम्ही त्यात भूक लागली होती आम्ही सर्व एकत्र जेवायला बसलो. नंतर रात्री स्विमिंग पूल च्या खुर्च्या होत्या त्या वर पडून गेलो, शांत वारा होता, आम्ही खुश होतो😊 आमच्या रूम च्या खाली DJ NIGHT पार्टी रोज रात्री असायची आम्ही त्या पार्टीचा आस्वाद घायचो आणि गम्मत म्हणजे तिथे रशियन लोक जास्त होते, दारू पिऊन धुंद नशेत बेभान होऊन नाचत होते आम्ही ते निरखून बघत होतो. नंतर तिथे एक रशियन लेडी होती तिने आम्हाला नाचायला थोडा फोर्स केला , आम्ही सुद्धा मनात कोणतीच ईर्षा न ठेवता तिच्या सोबत नाचू लागलो , जस आम्ही स्वप्नत बघितलंत होत तसंच सत्यात उतरलं होत.

रूम मध्ये आल्यावर मी दिप्ती अमोल नितेश आम्ही college च्या गप्पांमध्ये रमलो होतो २वाजता गप्पा संपल्या तेव्हा आम्ही झोपी गेलो.. .. . पण झोपण्यापूर्वी मी अनुकूल आणि नितेश असं आम्ही तिघांनी पुढच्या दिवशी कुठे कसं आणि कोणत्या route ने जायचं याच थोडं प्लॅनिंग केलं होत.. .

सकाळ झाली आम्ही ७ ३० ला उठलो आणि सगळे रेडी व्हायला लागले😎 रेडी होऊन आम्ही खाली आलो तिथे नाश्ता केला इथे थोडी गंमत झाली😂 ती म्हणजे अशी कि नाश्त्याला आम्हाला त्या दिवशी पुरी भाजी होती आम्ही प्रत्येकाने आधीच ३ ते ४ पुऱ्या खाल्या होत्या आणि आम्ही आणखी पुऱ्या मागत होतो बिचारा किचन मधल्या मुलाने कंटाळून सांगितलं कि पुऱ्या संपल्या.. .. .. . 😢

आम्ही एकमेकाकडे बघितलं थोडं हसलो आणि आम्ही पुढे निघालो आम्ही बाइक्स बुक केल्या होत्या त्या पण प्रश्न असा होता कि आम्ही ७ जण होतो आणि बाइक्स ४ बुक केल्या पण मींनाथ आणि माझ्या कडे licens नव्हतं licens होत ते फक्त नितेश आणि अनुकूल कडे, थोडी भीती होती पण अंगात किडे पण तेवढेच म्हणून जे होईल ते बगू असा विचार करून आम्ही निघालो एका मागोमाग आमची वर्दळ चालली होती पेट्रोल पंपावर टाक्या फुल्ल केल्या आणि पुढच्या प्रवासाला आम्ही निघालो.. . 😊



*(मध्ये मध्ये थांबत थांबत सगळे आले कि नाही याची शाश्वती आम्ही करत होतो आणि जो पर्यंत सगळे येत नाही तो पर्यंत मग अशे फोटो काढून आम्ही त्या आठवणींना साठवून ठेवत होतो)*




*(गोव्याला अश्या स्कुटी सर्रास मिळतात. फक्त तुमच्या कडे तुमचं स्वतःचा licens असायला हवं. फिरण्यासाठी स्कुटी जर हवी असेल तर ४०० रुपये प्रमाणे १ दिवस म्हणजे सकाळी १० ते रात्री ९. आणि हेल्मेट सुद्धा त्यांच्याकडून दिलं जातं कारण इथले ट्रॅफिक पोलीस खूपच स्रीक्ट आहेत. फोटो मध्ये सोबत दिप्ती आहे)*

आम्ही गूगल मॅप चालू केला होता, मंगेशी मंदिर हा आमचा पहिला स्पॉट होता म्हणून आम्ही मंगेशी मंदिराकडे निघालो आमचा वेग पण तेवढ जास्तच होता म्हणून आम्ही प्रत्येकाने हेल्मट्स सुद्धा घातले होते आणि तिथे ते नियम अनिवार्य आहेत😢अनुकूल मींनाथ अमृता हे आमच्या पुढे होते आम्ही मी नितेश दिप्ती आणि अमोल आम्ही मागे होतो आम्ही गोव्याच्या मेन ब्रिज वर होतो आणि पोलिसांना चकवा देणार इतक्यात ३ ट्राफिक पोलीस आमच्या समोर हजर 😊

आम्ही गाड्या बाजूला लावल्या, त्यांनी licence दाखव असा विचारलं नितेश ने दिलं मी पण एक झोल केला होती त्यामुळे मी वाचलो माझा licens चा प्रश्न सुटला होता पूढे त्यांनी सांगितलं कि तुम्ही ब्रिज वर ४० च्या स्पीड ने गाडी चालवली म्हणून १६०० fine भरा.. .. आम्ही त्यांना request करू लागलो कसंबसं ५०० देऊन आम्ही तिथून निघालो. .. . आता प्रत्येक ठिकाणी आमची नजर होती कि कुठे ट्रॅफिक पोलीस तर नाही ना.

आम्ही मंगेशी मंदिरापाशी पोहचलो पण तिथे तर एका बिल्डिंग मध्ये छोटं मंदिर होत त्याचा नाव मंगेशी temple होत.. . आम्ही खूप दमलो होतो कारण ३ तास गाडी चालवून आम्ही चुकीच्या ठिकाणी पोहचलो होतो आमचा सगळं राग आता नितेश वर होता कारण तोच map बघत होता😂😂

आम्ही तिथे १०मी बसलो एकमेकांकडे बघून हसायला पण येत होत पण नाईलाज होता अजून मंगेशी मंदिर ४० किमी अंतरावर होतं. कसं तरी विचारत विचारत आम्ही तिथे पोहचलो.



*(मंगेशी मंदिर पोंडा येथे आहे, इथलं वातावरण अगदी प्रसन्न आहे)*

आणि मनाला जरा बरं वाटलं, मंदिरात खूप स्वछता होती आणि वातावरण पण भारी होतं (मी नास्तिक आहे पण माझे मित्र देव मानतात कारण त्यांच्या प्रत्येकाचा प्रश्न आहे आणि मी माझ्या मित्रांना मानतो)म्हणून मंदिरात जाण मला गैर वाटलं नाही कारण आम्हा मित्र मैत्रिणीमध्ये जातपात देवधर्म असा काहीच नाही. पूढे पोंडा मध्ये एक मंदिर होत तिथे गेलो



*केवलम मठ श्री मंदिर पोंडा, गोव*



आता दुपार टळून चालली होती भूक खूप लागली होती पण आमचा मेनू फिक्स होत नव्हता पण अमृता मींनाथ अनुकूल आणि अमोल यांना नॉनव्हेज खायचं होत म्हणून ते लोक नॉनव्हेज खायला गेले मग मी नितेश आणि दिप्ती आम्ही वेज खायला गेलो







मी नितेश आणि दिप्ती आम्ही पंजाबी धाब्यावर बसलो होतो तेव्हा आम्ही ऑर्डर केलं होत जंबो थाळी आणि नाव होत अन्नपूर्णा. एकूण ९ अशे पदार्थ होते समोर मग अगदी तृप्त झालं होत.

(श्री मंदिर केवलंम मठ च्या बाहेर निघालो आणि पंजाबी ढाबा दिसला मी नितेश आणि दिप्ती आम्ही तिघे या हॉटेल मध्ये गेलो तर मींनाथ अमृता अमोल आणि अनुकूल शेजारच्या नॉनव्हेज हॉटेल मध्ये जेवायला)

मला सुद्धा नॉनव्हेज खायचं होत पण जाऊदे म्हंटल वेज खाऊ.. असा करत करत आम्ही पोंडा चा पूर्ण परिसर फिरलो होतो। आता साधारण ६ वाजले होते आम्ही ओल्ड गोआ चर्च येथे आलो



*(या वास्तू म्हणजेच हा चर्च basilica of bom jesus याच बांधकाम १५९४ मध्ये करण्यात आलं आहे आणि १५ मे १६०५ रोजी हा चर्च सर्वांसाठी खुला केला अशी प्राथमिक माहिती आम्हला मिळाली. )*





जशी जशी संध्याकाळ होत चालली होती, त्याच प्रमाणे चर्च चा वरचा भाग आणखीनच खुलत चालला होता, सोनेरी रंगाचा साज एखाद्या रूपवती ला सुद्धा लाजवेल इतका प्रखर आणि तेजस्वी होता , मला नाही राहवलं आणि मी तो फोटो काढायला सांगितलं



Archaeological Museum of Goa इथे जायचं होत पण आतील तांत्रिक काम चालू असल्या कारणाने प्रवेश बंद होता आम्ही फक्त दुरून फोटो काढला आणि पुढे निघालो

प्रसन्न वातावरण होत अगदी मनमोहक खूप जुना चर्च आहे तिथे थोडी माहिती भेटली फोटोस क्लिक केले आणि पुढे प्रवासाला निघालो , सूर्यास्त होत होता डोळे दिपवून टाकणारा सूर्यास्त होता तो शांत गार वारा चौफेर होता असा करत आम्ही पंजीम मध्ये पोहचलो




*मध्ये मध्ये थांबा घेऊन मी अशे फोटो मुद्दाम घेत होतो.*





*(पंजीम ला जात असतांना मुख्य रस्त्यावर मुख्य ब्रिज वर अभिमानाने डोलावणारा आपला तिरंगा दिसला, २ मिनिट गाडी बाजूला लावली आणि फोटो फोटो काढायचा मोह आवरला नाही, भले हि राज्य वेगळं असो पण अभिमान सारखाच)*




*(पंजीम मार्केट फिरत फिरत असतांना)*

खूप उलट सुलट प्रवास करत होतो । मग आम्ही decide केलं कि जाताना पुन्हा बागा बीच वर जाऊ म्हणून आम्ही निघालो.

रात्री ८ वाजता आम्ही बागा ला पोहचलो नयनरम्य वातावरण हीच तर गोव्याची खासियत आहे म्हणून रोषणाई मध्ये आम्ही फोटो काढत होतो



कारण ते फक्त फोटोस नव्हते तर आमच्या आठवणी आम्ही मोबाइल मध्ये साठवत होतो आम्ही फिरणायत इतके दंग कि रात्रीचे १० वाजले हे सुद्धा कळलं नाही तेव्हाच गाडीच्या मालकिणीचे फोन यायला सुरुवात झाली कारण गाड्या आम्हला ९ वाजता परत द्यायच्या होत्या आम्ही खूप घाई मध्ये जेवण घेतलं आणि तसंच निघालो आणि सरळ रूम वर पोहचलो.

नंतर पून्हा तेच बोलणं सुरु होत दिप्ती आणि माझं जे आम्ही आदल्या दिवशी बोलत होतो नितेश ला खूप झोप आली होती म्हणून आम्ही २ ३० वा झोपी गेलो..




पण झोपण्या आधी आम्ही कॅरम खेळायला बसलो होतो नितेश पाटील हा कॅरम मध्ये पटाईत होता हे माहित होतं तरी सुद्धा आम्ही त्यासोबत खेळायला बसलो.

अजून खूप फिरायचं होतं. पण जॉब कॉलेज यांमुळे वेळ कमी होता.

Agoda फोर्ट फिरायचं राहूनच गेलं. अशे खूप places राहून गेलं पण ठिक आहे पुन्हा कधी तरी सफर करून ते पूर्ण करण्याचा मानस आहे.

पुढे असाच आमचे दिवस फिरण्यात गेले , तोच दिनक्रम फक्त फिरण्याचे ठिकाण वेगळे, जेवण्याचे ठिकाणं वेगळी..

आता निघायचा विचार होता😢आदल्या दिवशी आम्ही सगळे लवकर झोपलो कारण सकाळी ६ वा उठायचं होत आणि मला खात्री होती कि जर मी लवकर नाही उठलो तर हे पण कोणी उठणार नाही म्हणून मी ६ वा चा अलार्म लाऊन झोपी गेलो😊ठरल्याप्रमाणे मी ६ वाजता उठलो , सगळ्यांना जाग केलं , घाई करायचा कारण कि ट्रेन ११ २० ची होती आणि मुख्य म्हणजे ती मडगाव वरून निघणारी ट्रेन होती त्यामुळे बसायला जागा मिळणे इतकाच आमचा विचार होता

सकाळी ८ वाजता आम्ही हॉटेल सोडलं आणि पुढे रस्तावर येऊन थांबलो थांबून तर १ तास आमचा असाच गेला कारण आम्ही ७ जण होतो आणि त्याप्रमाणे टॅक्सी मिळत नव्हती

आता ९ ३० वाजले तेव्हा कुठे एक टॅक्सीवाला आला (देवमाणूसच होता जणू) , आम्ही बसलो आणि आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. निघण्यापूर्वी एक ग्रुप फोटो काढला होता



*निघताना हा फोटो काढला होता. सोबत खूप साऱ्या आठवणी होत्या आणि आहेत. बिचारी दिप्ती ला या फोटो मध्ये pose काही देताच आली नाही. झोप झाली नसावी.*

गोव्यातून जाताना आठवणी सोबत घेऊन जायच्या होत्या तसे आम्ही काजू सोबत घेऊन चाललोच होतो 😊आम्ही १० ३० मिनिटांनी मडगाव ला पोहचलो घाई घाई मध्ये तिकीट काढली. ट्रेन पूर्ण खाली होती आम्हाला हेच पाहिजे होत आणि तसंच होत होतं

नितेश मींनाथ नाश्ता आणायला गेले तोवर आम्ही जागा पकडून बसलो होतो समान वैगेरे सगळं वर टाकून झाल होत

बरोबर ११ वाजून २० मिनिटांनी ट्रेन ने हॉर्न दिला आणि आमच्या चेहऱ्यावर एक स्मितहास्य आलं. आता घरी जायची ओढ लागली होती. सगळे आनंदी होते आम्ही पून्हा गप्पांच्या दुनियेत रंगलो होतो. गप्पा करता करता राजकारण या विषयावर सुद्धा आम्ही बोलू लागलो , अमृता मी नितेश अनुकूल मींनाथ दिप्ती प्रत्येकानी आपली मत मांडली आणि त्यातून एक जागरूक नागरिकाची भूमिका स्पष्ट झाली.

एक विलक्षण दुनियेच्या प्रवाहातून आम्ही चाललो होतो. मींनाथ नितेश आणि अमोल हे आमच्या आधी ट्रेन स्लो झाली तिथे उतरले आणि मी अमृता अनुकूल दिप्ती आम्ही पनवेल ला उतरलो. जीवनातील दुसरी ट्रिप होती या दोस्तांसोबत, एक वेगळीच ऊर्जा मिळाली, नातं प्रेमाचं असो कि मैत्रीचा त्यात आपुलकी असली कि ते मार्गी लागतं.

सर्वच खूप दमलो होतो, व्हाट्सअँप ग्रुप वर पोहचलो रे अशे msg येत होते. मनाला बरं वाटत होतो, मी मावशीकडे टिटवाळ्याला गेलो.

आम्ही जरी आपल्या आपल्या घरी पोहचून झोपलो असू पण आमच्या मनातील गोव्याची सफर हि तशीच होती , विलक्षण अनुभव होता आमच्यासाठी.

५ दिवसांचा सफर कसा गेला समजलंच नाही

गोवा फिरणं हा तर फक्त आमचा बहाणा होता परंतु आतील मैत्री जपणं हा त्या मागचा उद्देश होता. कधी कधी सगळं जवळ असून पण खूप लांब असल्यासारखा वाटतं , म्हणून जीवनात मैत्रीला महत्व द्या नात्याला महत्व द्या एकमेकाला वेळ द्या दुनिया आज आहे उद्या नाही ❤️‍🩹

जीवनाच्या ट्रॅक वरून जाताना नेहमीच ग्रीन सिग्नल मिळेल कि नाही माहिती नाही पण तुमच्या सारखे मित्र प्रत्येक ट्रॅक वर मिळूदे 😘 आजून तुमच्या सोबत खूप ट्रिप मारायच्या आहेत तर नक्की भेटू पुढच्या वर्षी नवीन ठकाणी आणि ज्योती कोर आणि सलोनी सोनवणे तुम्ही पण या.. ..

थँक यु नितेश अमृता दिप्ती मींनाथ अमोल अनुकूल LUB YOU GUYS.. .. . MISS OUR गोवा MEMORIES😥😊

📝 जितेश देविदास उबाळे

९९२१४८३९९३

मु. पो. किन्हवली ता शहापूर ठाणे

## जग सुंदर आहेच.

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक, चित्रकार, छायाचित्रकार, कलावंत अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य “जाणवू” लागते. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी शंभरहून अधिक पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला...” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा.

esahity@gmail.com